नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - ३५९ Issue - 359 | वार रविवार दि. १८ मे २०२५ Blow- Sunday Date 18 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com



# अक्कलकोट तालुक्यातील जनसेवक व्यक्तिमत्व: गोगाव गावचे विद्यमान उपसरपंच.मा.श्री. कमलाकर सोनकांबळे

## आज १८ मे... पत्रकार, संपादक, समाजसेवक, गोगाव गावचे विद्यमान उपसरपंच श्री. कमलाकर सोनकांबळे यांचा आज जन्मदिवस... त्यानिमित्त आजचा हा शब्दप्रपंच..



अक्कलकोट तालुक्यातील वागदरी पंचक्रोशीतील निसर्गाच्या सानिध्यात वसलेल,मोजकीच लोकसंख्या असलेलं टुमदार गाव म्हणजे गोगाव. या गावातील अनेक व्यक्तीमत्वानी आपल्या कल्पक बुद्धिमत्तेच्या, कर्तृत्वाच्या,नेतृत्वाच्या जोरावर वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आपला ठसा उमटवलेला आहे. गोगाव गावातील अनेकांनी आपल्या स्वकर्तुत्वाच्या बळावर वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये मोठी भरारी घेतलेली आहे. पण त्यांनी आपले जन्मगाव असलेल्या गोगावची नाळ कधीच तुटू दिले नाहीत.श्री. मधुकर सुरवसे, श्री. लकप्पा गायकवाड,श्री. कल्लाप्पा बनसोडे, श्री.प्रदीप जगताप ( माजी सरपंच), श्री.कल्याणराव बिराजदार (तात्या) यांचे गोगाव गावासाठीचे योगदान अमूल्य आहे. त्यामुळे यांच्या नावाचा उल्लेख प्रामुख्याने या ठिकाणी करावासा वाटतो. यांच्याच समाजकार्याच्या पवित्र माळेमध्ये गुंफले जाणारे, या सर्वांच्या समाज सेवेचा वारसा पुढे घेऊन जाणारे नाव म्हणजे गोगाव गावचे विद्यमान उपसरपंच श्री. कमलाकर सोनकांबळे साहेब...

गोगाव गावातील श्री. ज्ञानदेव व सौ. राजवा सोनकांबळे या समाजसेवक मातापित्यांच्या पोटी श्री. कमलाकर यांचा जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण हे गोगाव येथे झाले तर माध्यमिक शिक्षण श्री. एस एस शेळके प्रशाला वागदरी या ठिकाणी झाले. उच्चमाध्यमिक शिक्षण हे ज्युनियर कॉलेज मुरूम या ठिकाणी झाले. त्यांनी शालेय शिक्षण घेत असतानाच पत्रकारिता सुरू केले असून, दैनिक लोकमत मध्ये युवा मंच व दैनिक संचार मध्ये तरुणाई या सदरासाठी कॉलेज प्रतिनीधी म्हणून काम करत असतानाच त्यांचा ओढा हा समाजातील वाईट प्रथा परंपरेला मातीत गाढून, भेदभाव विरहित नवसमाज निर्मिती झाली पाहिजे याकडे होता. त्यातूनच ते वेगवेगळ्या मार्गाने समाजकार्याकडे वळले. समाजकार्याचे बाळकडू हे त्यांना त्यांच्या वडिलांकडूनच भेटले. त्यांचे वडील हे चळवळी वृत्तीचे होते . भजन कीर्तन भारुड यांचे ते उत्तम प्रकारे गायन करत. तसेच ते जमेल तसे सामाजिक जागृती करण्याचा प्रयत्न करत होते.वेगवेगळ्या मार्गाने श्री. कमलाकर सोनकांबळे हे समाजकार्य करत असतात. त्यांचे समाजसेवेचे प्रमुख अस्त्र म्हणजे त्यांचे दैनिक यश सिद्धी न्युज हे वृत्तपत्र. ते या वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजातील अनेक वाईट प्रथा, परंपरा, रूढी यावर सडेतोडपणे प्रहार करत असतात. त्यांनी आत्तापर्यंत अनेक वेगवेगळ्या ग्रंथांचे,पुस्तकांचे वाचन केलेले आहे. यातूनच त्यांची वैचारिक समृद्धी वाढत गेली आणि समाजातील अन्याय अत्याचार विरुद्ध त्यांच्या मनामध्ये चिड निर्माण होऊ लागली. मग ते आपल्या निर्भीड पत्रकारितेतून याला वाचा फोडण्याचे काम करू लागले.

दिवसा गणिक समाज बदलत आहे.समाजामध्ये अन्याय, अत्याचाररुपी वाईट प्रवृत्तीने सारा समाज पोखरून निघत आहे. त्या समाजाला दिशा देण्याचे, धाडस देण्याचे कार्य हे आपल्या परखड लेखणीच्या माध्यमातून श्री.कमलाकर सोनकांबळे हे करत आहेत. तालुक्यातील सर्वपक्षीय राजकारण्यांशी श्री.कमलाकर सोनकांबळे यांचे अतिशय जिव्हाळ्याचे संबंध आहेत. या जिव्हाळ्याच्या संबंधाच्या माध्यमातून ते सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करत आहेत. उजनीचे पाणी कुरनुर धरणात आल्यामुळे धरण परिसरातील शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये खऱ्या अर्थाने आर्थिक समृद्धी येण्यास मदत होत आहे.या कुरनूर धरणाचे पाणी घोळसगाव तलाव व त्यातून भुरीकवठे,गोगाव, वागदरी या भागामध्ये आले पाहिजे व यामुळे आपल्या भागातील शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये देखील समृद्धी आली पाहिजे यासाठी ते प्रयत्न करत आहेत. आपल्या दुष्काळी भागामध्ये पाण्याची पातळी वाढवण्यासाठी, आहे ते तलाव खोल केले पाहिजे. त्यामुळे पावसाळ्यामध्ये या तलावामध्ये पाणी जास्त प्रमाणामध्ये साठवून त्याचा उपयोग पावसाळ्यानंतर शेतकऱ्यांना शेतीसाठी व गावच्या पिण्याच्या पाण्यासाठी होईल असे त्यांचे मत आहे. व त्यासाठी त्यांचे प्रयत्न चालू आहेत .अशा प्रकारे सर्वच बाबतीमध्ये त्यांचे कार्य हे सतत आविश्रांत चालूच आहे.जगामध्ये फक्त आणि फक्त बोलक्या सुधारकांचा भरणा भरलेला असताना,आपल्या कार्यातून,वाणीतून लेखणीतून समाजाला दिशा देण्याचे कार्य श्री. कमलाकर सोनकांबळे हे करत आहेत. नुसताच दिखाव्या पुरत समाजकारण आणि स्वतःचे घरदार भरण्यासाठी राजकारण करणारे खूप आहेत, पण आपल्या समाजकारणातून आणि जनप्रिय राजकारणातून सर्वसामान्य जनतेचे आयुष्य सर्वांग सुंदर सजवणारे श्री. कमलाकर सोनकांबळे हे याला अपवाद आहेत. श्री. कमलाकर सोनकांबळे हे आपल्या वागदरी पंचक्रोशीतील बहुआयामी व्यक्तिमत्व आहेत. ते शिक्षण, राजकारण, साहित्य,कला, क्रीडा समाजकारण,पत्रकारिता या सर्वच विषयाची जाण असणारे प्रगल्भ व्यक्तिमत्व आहेत. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आचार विचारावर श्रद्धा ठेवून, डॉक्टर बाबासाहेब यांचे विचार व छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिकवण व संघर्ष हे सर्वसामान्य लोकापर्यंत पोहोचवण्याचे महान कार्य हे श्री. कमलाकर सोनकांबळे हे करत आहेत.डॉ. बाबासाहेबांनी आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये अनेक हालअपेष्टा सहन करून,दलित समाजाच्या उद्धाराचे कार्य केले. हातात सत्ता असल्याशिवाय समाजाची प्रगती होऊ शकत नाही. त्यासाठी प्रथम सत्तेच्या सिंहासनावर बसले पाहिजे, या विचाराने प्रेरित होऊन श्री. कमलाकर सोनकांबळे यांनी आपल्या आफाट समाजकार्याच्या जोरावर, सर्वसामान्यांच्या मदतीने आज ते गोगाव गावच्या उपसरपंच पदावर विराजमान आहेत आणि या पदाच्या माध्यमातून ते आपल्या समाज बांधवांच्या जीवनामध्ये आर्थिक सामाजिक, शैक्षणिक स्तर उंचावण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांचे जीवनकार्य हे अनेकांना प्रेरणादायी आहे. श्री. कमलाकर सोनकांबळे हे आपल्या कृतीतून,आपल्या विचारातून ग्रामीण भागामध्ये समाजसेवेचे, जनसेवेचे बीज रोवण्याचे महान कार्य करत आहेत. अक्कलकोट तालुक्याचे विद्यमान आमदार श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून सामाजिक विकास करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृह, सम्यक अभ्यासिका केंद्राचे निर्मिती अंतिम टप्प्यात आहे, आपल्या ग्रामीण भागातील युवकांना डॉ.बाबासाहेबांच्या महान कार्याची ओळख व्हावी, यासाठी गोगाव या आपल्या जन्म गावामध्ये १४ एप्रिल या डॉक्टर. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे अवचित्य साधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेबांच्या पुतळा उभारणीचे भूमिपूजन स्वतः पुढाकार घेऊन, आपल्या नेतृत्वाखाली पार पाडले.डॉ. बाबासाहेबांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांनी गावातील व गोगाव पंचक्रोशीतील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक कला, क्रीडा,साहित्य या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सन्माननीय व्यक्तींना वेगवेगळे पुरस्कार देऊन सन्मानित केले. या पुरस्काराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शोषित वंचित क्षेत्रातील मंडळींना प्रेरणा देण्याचे काम आदरणीय श्री. कमलाकर सोनकांबळे यांनी केले आहे. ते आपल्या मालकीच्या असलेल्या दैनिक यशसिद्धी न्यूज या वर्तमानपत्राच्या माध्यमातून ग्रामीण भागातील जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे, ग्रामीण जनतेचे सुखदुःख समाजासमोर यथोचित मांडण्याचे कार्य करत आहेत. ते आपल्या चौकस आणि निपक्ष, निडर पत्रकारितेच्या जोरावर तालुक्यातील जनतेचे प्रश्न शासन दरबारी मांडून त्यांना न्याय मिळवून देण्याचे कार्य करत आहेत. श्री. कमलाकर सोनकांबळे हे पत्रकारिता,राजकारण, समाजकारण या सर्व क्षेत्रांमध्ये अतिशय उच्च दर्जाचे कार्य करत आहेत. ते आपल्या सर्वच महापुरुषांची जयंती अतिशय उत्साहामध्ये दरवर्षी साजरी करत असतात.यावेळी प्रथमच श्री. कमलाकर सोनकांबळे यांच्या नेतृत्वात गोगाव येथे शिव बसव आंबेडकर संयुक्त जयंती मोठ्या उत्सवात साजरी करण्यात आले.या सर्व महापुरुषांची जयंती साजरी करण्याचा उद्देश म्हणजे,या महापुरुषांचे विचार हे तळागाळापर्यंत पोहोचले पाहिजेत, समाजाचे संस्करण झाले पाहिजे आणि त्यातून सशक्त समाज उभा राहिला पाहिजे हेच आहे. श्री. कमलाकर सोनकांबळे यांच्या समाजकार्याची दखल घेऊन त्यांना वेगवेगळ्या अनेक प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. ते सध्या सम्यक बहुउद्देशीय सहकारी संस्थेचे चेअरमन,सम्यक उद्योग समूहाचे चेअरमन, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष व ज्या संस्थेच्या मालकीचे वृत्तपत्र ते चालवतात अशा सिद्धार्थ सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष म्हणून ते काम पाहत आहेत. कोरोना काळामध्ये सोलापूर, अक्कलकोट, गोगावं ग्रामीण भाग व पुण्यासारख्या शहरात संस्थेच्या माध्यमातून मोफत किट वाटप करण्यात आले आहेत व त्यासोबत कोरोना विषयी जनजागृती करण्यात आलेली होती.ग्रामीण भागातील तरुण हा व्यवसायभिमुख झाला पाहिजे,तो उद्योग धंद्याच्या माध्यमातून आपल्या जीवनात सुख समृद्धी आणली पाहिजे यासाठी ते आपल्या लेखणीतून,वाणीतून समाज प्रबोधन करण्याचे काम सतत करत असतात. व्यसनाधीनतेला आळा घालण्याचे काम ते करत असतात. ते आपल्या सम्यक उद्योग समूह या संस्थेच्या माध्यमातून अनेक नवयुकांना उद्योग धंद्याची माहिती देऊन, त्यांना उद्योग धंदा करण्याकडे प्रेरित करण्याचे महत्त्वाचे काम करत आहेत. ते सतत गोरगरीब समाज बांधवांना मदतीचा हात देत असतात .अनेक सरकारी योजनांची माहिती व या योजनांचा लाभ ते सर्वांना मिळवून देण्याचे कार्य करत असतात. सरकारी योजना या जनतेच्या कल्याणासाठी असतात ,त्याचा लाभ सर्वांना मिळालाच पाहिजे हा यामागचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न असतो. त्यांच्या तेजस्वी समाज कार्याबद्दल लीहिण्यासारखे खूप खूप आहे.पण तूर्तास एवढेच...



गोगावच्या क्षितिजावरील हा तेजस्वी तारा असाच सदैव तळपत राहू दे. अशा या बहुआयामी व्यक्तिमत्वाला उदंड आयुष्य लाभू दे आणि आपल्या हातून उदंड समाज कार्य घडत राहू दे हीच आजच्या या आपल्या वाढदिवसाच्या शुभ दिनी सदिच्छा. आणि आपणास वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा....

**– शब्दांकन..**
**श्री मारुती देविदास शिंदे.**
**मु.पो. वागदरी. ता.अक्कलकोट..**
**मो.७०८३५६३६५९.**

# पुणे जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षकपदी संदिपशिंग गिल यांची नियुक्ती

पुरंदर प्रतिनिधी/ डॉ विनायक गायकवाड : पुरंदर : पुणे शहर दलातील परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त संदीप सिंगगिल साहेब यांची पुणे जिल्हा ग्रामीणच्या पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांची पदोन्नती पुणे शहर पोलीस दलात



अतिरिक्त पोलीस आयुक्त पदी बदली करण्यात आली आहे. पुण्यात काम करताना गिल साहेब एक 'दबंग ' अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. गणेशोउत्सवा त त्यांनी केलेले कामकाज उल्लेख निय आहे. महत्वाची आंदोलणे तशेच महत्वाचे गुन्हे यशस्वीरित्या हाताळले आहेत.

पुणे शहर आयुक्त अमितेश कुमार साहेब यांनी संदिपशिंग गिल साहेब यांच्या बदलीचा आदेश शनिवार दि. १७/५/२०२५ रोजी दिला आहे.

# राजकारणापेक्षा समाजकारणाला महत्व देत, शेतकरी व युवकांना आर्थिक बळ देण्याचे काम मनसेच्या वतीने करण्यात येते : दिलीप बापू धोत्रे

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेहमीच राजकारणापेक्षा समाजकारणाला जास्त महत्त्व दिलेले आहे सर्वसामान्य शेतकरी व सर्व सामान्य जनता त्याप्रमाणे बेरोजगार युवक युवती यांना यांच्या हाताला काम देण्याचे उद्देशाने धोत्रे ग्रँड प्रावेट लिमिटेड या उद्योग समूहाच्या वतीने आम्ही हॉटेल पेट्रोल पंप ट्रॅक्टर शोरूम अशा विविध छोट्या-मोठ्या उद्योग व्यवसायाच्या माध्यमातून शेतकरी वर्ग तसेच विद्यार्थी लोकांना त्यांच्या हाताला काम देण्याची आर्थिक



परिस्थितीला बळ देण्याचे देण्याचे काम सातत्याने प्रयत्न करीत आलेलो आहोत.

मंगळवार दिनांक २० मे २०२५ रोजी सायंकाळी पाच वाजता पंढरपूर येथील अहिल्या चौक पंढरपूर ते पुणे रोड भटुंब या ठिकाणी ग्रँड ट्रॅक्टर या नूतन व्यवसायाची सुरुवात करीत आहोत या ग्रँड ट्रॅक्टरचे व्यवसाय चे उद्घाटन वंचित येथे माजी गृहराज्यमंत्री बाळ नांदगावकर साहेब यांच्या शुभहस्ते व सन्माननीय ह भ प यशवंतराव न नागदे चेअरमन धाराशिव सहकारी बँक यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे या कार्यक्रमास असंख्य राजकीय तसेच सामाजिक नेते मंडळी उपस्थित राहणार आहेत अशी माहिती मनसेचे नेते दिलीप बापू धोत्रे पत्रकार परिषदेत दिली.

दिलीप धोत्रे पत्रकार परिषदेमध्ये पुढे बोलतात बोलत असताना त्यांनी पुढील माहिती दिली ग्रँड ट्रॅक्टर च्या वतीने सर्वसामान्य शेतकऱ्यांना ट्रॅक्टर खरेदीच्या वेळी लकी द च्या माध्यमातून विजेते शेतकऱ्यांना चार गाडी भेट देण्यात येणार आहे तसेच अन्य ट्रॅक्टर्स खरेदी धारकांना भेटवस्तूचाही लाभ मिळणार आहे गरीब शेतकऱ्यांना सुलभ कर्जाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे ग्रँड ट्रॅक्टरच्या माध्यमातून ५० ते ६० युवक युतींना रोजगार उपलब्ध होणारा कोण त्यामुळे बेरोजगार युवकांना हाताला आर्थिक बळ मिळणार आहे अशी माहिती मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी आज रोजी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

**नळदुर्ग येथिल मरिआई ग्राउंडला संरक्षण भिंत बांधावी, वागदरी साठवण तलावाचे काम सुरू करावे यासह विविध विकास कामाची जनतेनी केली मागणी**

# नळदुर्ग येथे आयोजीत आमदार राणा दादा यांच्या जनता दरबारास उत्सफूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड) : तुळजापूर विधानसभा मतदार संघातील नळदुर्ग सह परिसरातील जवळपास ५० ते ६० गावातील समस्या जानूण घेण्यासाठी तुळजापू विधानसभा मतदार संघाचे विद्यामानआमदार राणाजगजितसिंह पाटील यानी दि.१६ मे २२५ रोजी सकाळी ११.३० वा.दरम्यान नगर परिषद नळदुर्ग कार्यालयाच्या प्रांगणा जनता दरबार कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या जनता दरबारास उत्सफूर्त प्रतिसाद मिळला असून नळदुर्ग येथिल मरिआई मैदानास संरक्षण भिंत बांधावी, नळदुर्ग येथून जवळच अंतरावारअसलेल्या वागदरी शिवारात मंजूर असलेले व गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेले वागदरी साठवण तलावाचे काम सुरू करावे, शेतकऱ्यांचा पिक विमा मिळवा, आदी सह नळदुर्ग शहरातील व परिसरातील गावा गावातील अंतर्गत विकासकामे करावीत आदी मागण्यासह वैयक्तीक आडीआडचणी बाबत आमदार राणा दादा यांच्यासी चर्चा करून निवेदने यावेळी देण्यात आली.

या प्रसंगी भाजपा जिल्हा अध्यक्ष दत्ता कुलकर्णी, अनिल काळे, अँड. दिपक दादाअलूरे, दत्ता राजमाने, विलास राठोड, रंजना राठोड, बसवराज धरणे, साहेबराव घुगे, श्रमिक पोतदार, आशिष सोनटक्के पांडुरंग पुदाले, उलीश बताले महादेव पाटील,विजय शिंगाडे, दयानंद मुंडके, धिमाजी घुगे, सागर हाजारे,सह वागरी, गुजनूर, शहापूर, दहिणा, होर्टी, मुर्टा, जळकोट, सिंदगाव, निलेगाव सह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### विनाकारण शिवीगाळ करत मारहाण; अनोळखी पाच ते सहा जणांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : लोकांची गर्दी पाहून नवदुर्गा माता मंदिर येथे फिर्यादी




तनवीर ईलाही शेख (वय-३३, रा. कुमार स्वामी सोसायटी,मित्र नगर,शेळगी) यांच्या ओळखीचे योगीराज हुबळीमठ यांना कसली गर्दी जमा झाली आहे. असे विचारून दुकानाकडे जात असताना अनोळखी पाच ते सहा इसम यांनी विनाकारण शिवीगाळ करून फिर्यादी यांच्या डोक्यात मारून जखमी केल्याची घटना १६ मे रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास चाट ला चौक भवानी पेठ येथे घडली.याप्रकरणी तनवीर शेख यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अनोळखी पाच ते सहा हे इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोसई.बामणे हे करीत आहेत.


# अणुबॉम्बच्या धमकीला भीक घालत नाही : केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आक्रमक

## आम्ही पाकिस्तानमध्ये १०० किमीपर्यंत आत घुसून दहशतवाद्यांना प्रत्युत्तर दिलं

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पहलगाम हल्ल्याचा बदला घेताना भारताच्या सैन्यदलांनी ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांचे अड्डे उद्धवस्त केले होते. तसेच या कारवाईला पाकिस्तानने प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केल्यावर भारतीय सैन्यदलांनी पाकिस्तानच्या हवाई तळांवर तुफानी हल्ला चढवत जबर नुकसान केले होते. त्यामुळे पाकिस्तानला युद्धविरामासाठी विनवणी करणे भाग पडले होते. त्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मोठं विधान केलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला विकसित बनवण्यामध्ये कुठलीही कसर बाकी ठेवलेली नाही. देशाला सुरक्षित ठेवण्याचं काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. २०१४ पूर्वी नेहमी दहशतवादी हल्ले व्हायचे. अनेक कटकारस्थाने व्हायची. मात्र त्याला काहीच उत्तर दिलं जात नव्हतं. मात्र आता असं होत नाही. ऑपरेशन सिंदूरदरम्यान, आमच्या सैन्यदलाने चोख प्रत्युत्तर दिलं. सैन्यदलामुळे आमची मान अभिमानाने उंचावली. आम्ही आता अणुबॉम्बच्या धमकीला भीक घालत नाही, असेही अमित शाह म्हणाले. एका कार्यक्रमाला संबोधित करताना अमित शाह म्हणाले की, आम्ही पाकिस्तानमध्ये १०० किमीपर्यंत आत घुसून प्रत्युत्तर दिलं आहे. भारताने पाकिस्तानचे हवाईतळ उद्धवस्त केले. आमची एअर डिफेन्स सिस्टिम खूप मजबूत आहे. आज पाकिस्तान भयभीत झालेला आहे. नरेंद्र म



ोदी यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली तेव्हापासून दहशतवाद्यांनी तीन मोठे हल्ले केले आहेत. काही दिवसांपूर्वी पहल-गाममध्ये पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्येक हल्ल्याला प्रत्युत्तर दिलं आहे. आज भारताने केलेल्या कारवाईकडे संपूर्ण जग आश्चर्यचकीत होऊन पाहत आहे. तर पाकिस्तान भयभीत झालेलं आहे. अमित शाह पुढे म्हणाले की, जेव्हा उरी येथे हल्ला झाला तेव्हा सर्जिकल स्ट्राईक करून प्रतीकात्मक उत्तर देण्यात आलं. पुलवामा येथे हल्ला झाला तेव्हा एअर स्ट्राईक करून उत्तर देण्यात आलं. मात्र पाकिस्तानमधील दहशतवादी सुधरले नाहीत आणि त्यांनी पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला केला. त्यानंतर ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून या दहशतवाद्यांच्या तळांना लक्ष्य करण्यात आलं. जगभरातील संरक्षण क्षेत्राशी संबंधित लोक जेव्हा ऑफरेशन सिंदूरचं विश्लेषण करतात. तेव्हा ते आश्चर्यचकीत होतात, असेही अमित शाह म्हणाले.

# युट्युबर ज्योती मल्होत्राच्या मुसक्या आवळल्या; पाकिस्तानी गुप्तचर एजंटांशी संपर्क ठेवत संवेदनशील माहिती शेअर केल्याचा आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : हरियाणातील ट्रॅव्हल युट्यूबर ज्योती मल्ह-ोत्राला पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोप-ाखाली अटक करण्यात आली आहे. आतापर्यंत पंजाब आणि हरियाणातील मालेरकोटला येथून एकूण ६ पाकिस्तानी हेरांना अटक करण्यात आली आहे. ज्योती मल्होत्रा

ही पाकिस्तान उच्चायुक्तालयात काम करणाऱ्या दानिश नावाच्या अधिकाऱ्याच्या संपर्कात होती आणि दानिशने तिला पाकिस्तानला पाठवले होते. ज्योती मल्होत्रा स्वतःचे ट्रॅव्हल चॅनल चालव-ते, ती पाकिस्तानलाही गेली होती आणि पाकिस्तानमध्ये अनेक गुप्तचर माहिती शेअर करत होती. हिने पोलिसांना सांगितले की तिचा 'ट्रॅव्हल विथ-जो' नावाचा युट्यूब चॅनल आहे. ती पासपोर्टधारक आहे आणि २०२३ मध्ये पाकिस्तानला जाण्यासाठी व्हि-सा मिळवण्यासाठी ती दिल्लीतील पाकिस्तान उच्चायुक्तालयात गेली होती, जिथे तिची भेट अहसान-उर-रहीम उर्फ

दानिशशी झाली. तिने अहसान-उर-रहीम उर्फ दानिशचा मोबाईल नंबर घेतला होता आणि नंतर त्याच्याशी बोलू लागली.



त्यानंतर ती दोनदा पाकिस्तानला गेली जिथे दानिशच्या सांगण्यावरून ती त्याचा आ-ोळखीचा अली अहवानला भेटली, जिथे अली अहव-ानने तिच्या राहण्याची आणि प्रवासाची व्यवस्था केली. पाकिस्तानात अली अहवानने पाकिस्तानी सुरक्षा आणि गुप्तचर अधिकाऱ्यांसोबत तिची भेट घडवून आणली. तिथं ज्योती शकीर आणि राणा शाहबाज यांनाही भेटले. तिने शकीरचा मोबाईल नंबर घेतला आणि तो तिच्या मोबाईलमध्ये जट राधवान या नाव-ाने सेव्ह केला जेणेकरून कोणालाही संशय येऊ नये. त्यानंतर ती भारतात परत आली. त्यानंतर ती व्हॉट्सअॅप, स्नॅप चॅट आणि टेलिग्राम सारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे त्या सर्वांशी सतत संपर्कात राहिली आणि देशविरोधी माहितीची देवाणघेवाण करू लागली.

ज्योती दिल्लीतील पाकिस्तान उच्चायुक्तालयातील अधिकारी अहसान-उर-रहीम उर्फ दानिशला अनेक वेळा भेटत राहिली. ज्योतीच्या चौकशीतून असे दिसून आले आहे की ती पाकिस्तानी गुप्तचर संस्थेच्या संपर्कात होती. ज्योतीने संशयास्पद कारवाया करून आणि शत्रू देश पाकिस्तानच्या एका नागरिकासोबत भारतीय गुप्तचर माहितीची देवाणघेवाण करून भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता धोक्यात आणण्याचा गुन्हा केला आहे, ज्याला भारत सरकारने हेरगिरीच्या आरोपाखाली पर्सोन-नॉन-ग्राटा घोषित केले आहे.

# बसस्थानकातून बालिकेला पळवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानक आवारातून अज्ञ-ातानं ०३ वर्षीय बालिकेला पळवून नेल्याची घटना बस स्थानक परिसरात शुक्रवारी, १६ मे रोजी सकाळी ११.४० वा.च्या सुमारास घडलीय. ईश्वरी लक्ष्मण शिंदे असं बालिकेकं नाव आहे.याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय.

याबाबत मिळालेली प्राथमिक माहिती अशी की, उत्तर सोलापूर तालुक्यातील रानमसले येथील रहिवासी लक्ष्मण साहेबराव शिंदे हल्ली शिवशक्ती हॉटेलच्या पाठीमागे, विजयकुमार दिघे यांचे घरात भाड्याने वास्तव्यास आहेत. ते त्यांची पत्नी व मुलगी ईश्वरी यांना एस. टी. ने बार्शी येथे पाठविण्यासाठी बस स्थानक परिसरात आले होते.

शिंदे बार्शीला जाणाऱ्या विना थांबा एस. टी. चे तिकीट काढण्याकरिता रांगेत थांबले असता, सुट्टे पैसे मागण्याकरीता पत्नीस तिकीट खिडकीजवळ बोलावून घेतले.त्यांच्या पत्न-ीने मुलगी ईश्वरी ला ती जिथे थांबली होती, तिथंच सोडून सुट्टे पैसे देण्याकरीता आली.

ती थांबलेल्या ठिकाणी परत गेली असता, मुलगी ईश्वरी ही तिथं दिसून आली नाही.बालिका ईश्वरी त्या ठिकाणावरून हरविल्याच्या माहितीनं धास्तावलेल्या शिंदे दाम्पत्यांनं सीसीटिव्ही फुटेज पाहिले.त्यात कोणीतरी एक अनोळखी महिला ईश्वरी हिस घेऊन जात असल्याचे दिसून आले. त्या अनोळखी महिलेनं ईश्वरीला पळवून नेत असल्याचे दिसून आल्यावर लक्ष्मण साहेबराव शिंदे यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.त्यानुसार ईश्वरी हिला पळवून नेल्याप्रकरणी त्या महिलेविरुध्द भा. न्याय संहिता कलम १३७ (२) प्रमाणे शुक्रवारी रात्री गुन्हा दाखल करण्यात आलाय. सहाय्यक पोलीस निरीक्षक खंडागळे या गुन्ह्याचा अधिक तपास करीत आहेत.

# दहावी बोर्डमध्ये शिवराज कदमचे यश




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/ प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील रोपळे गावचा सुपुत्र आणि पारगाव येथील एबीपी शिक्षण समूहातील विद्यार्थी शिवराज उमेश कदम या विद्यार्थ्याने इयत्ता दहावीच्या परीक्षेमध्ये ९८.८० टक्के गुण मिळवून कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दुसरा क्रमांक पटकावण्याचा मान मिळवला आहे.

शिवराजच्या या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत असून एबीपी शिक्षण समूहाचे संस्थापक अध्यक्ष ए. बी. पाटील, सचिव अमोल पाटील, राजलक्ष्मी पाटील, संचालिका आकांक्षा पाटील, प्राचार्य एस आर पाटील, शिक्षक, कर्मचारी, रोपळे ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.

तसेच या यशासाठी शिवराज यास एबीपी शिक्षण समूहातील शिक्षक, कर्मचारी, वडील उमेश कदम यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# सैनिक टाकळीतील शेतकऱ्यांच्या मुलांचे शैक्षणिक क्षेत्रात घवघवीत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी/ संजय चव्हाण : सैनिक टाकळी. तालुका शिरोळ जिल्हा कोल्हापूर येथील श्री विजय पाटील (बंदरी परिवार). विजय पाटील एक सामान्य शेतकरी यांचे सर्व जीवन शेतीवरच अवलंबून आहे. विजय पाटील व यांच्या पत्नी यांचे शिक्षण दहावीपर्यंत. कुटुंबाला कोणताही शैक्षणिक वारसा नाही. ते शेतकरी असल्यामुळे परिवारात सुद्धा शैक्षणिक वाता-वरण नाही. आता त्यांची दोन मुले मुलगी कुमारी आकांक्षा पाटील व मुलगा आयुष पाटील या दोघांनी या कुटुंबाचे शैक्षणिक वातावरणच बदलून टाकले आहे. मुलगी आकांक्षा पाटील हिचे दहावीपर्यंत शिक्षण



AYUSH PATIL (96.80 %)



Aakanksha patil 98.20% (maths 100 marks)

संजीवनी विद्यालय, तेरवाड येथे झाले. कोणताही क्लास नाही किंवा शैक्षणिक मार्गदर्शन नसताना सुद्धा या मुलीने दहावी मध्ये ९८.२०% टक्केवारी घेऊन एक नवा विक्रम दोन वर्षांपूर्वी घडवला होता त्यानंतर ती आत्ता बारावी परीक्षा पास झाली आणि तिला १२th सायन्स मध्ये ८३% मार्क घेऊन ती उत्तीर्ण झाली आहे. तिने नीटची परी-क्षा दिली आहे आणि आपण अशा करूया की तिला निश्चितच एमबीबीएस साठी ॲडमिशन मिळेल. त्यांचा मुलगा कु. आयुष पाटील हा सुद्धा दहावीपर्यंत संजीवनी विद्यालय तेरवाड येथे शिकत होता आणि त्यांने सुद्धा दहावीच्या परी-क्षेमध्ये ९६.६० गुण घेऊन आपला आदर्श निर्माण केला त्याची सुद्धा एमबीबीएस डॉक्टर होण्याची इच्छा आहे. या दोघांनी सर्वा पुढे एक उद-ाहरण निर्माण केले आहे की शैक्षणिक वारसा नसला तरीही कष्टाच्या जोरावर भरारी मारू शकतो. खरोखरच शिक्षणाची ओढ असली तर त्याला परिवार श्रीमंतच हवा आहे असे नाही या मुलांनी दाखवून दिले आहे. एक शेतकरी वडिलांना सुद्धा त्यांच्या मुलाचा इतका अभिमान आहे की ते आपले सर्व काही गहाण ठेवून या मुलांचे भविष्य घडविण्यासाठी दिवस-रात्र एक करत आहेत. या मुलांच्या यशामध्ये त्यांच्या शिक्षका बरोबर त्यांच्या आई-वडिलांचा खूप मोठा वाटा आहे. या मुलांनी खरोखरच सैनिक टाकळीचे नाव उंचावले आहे आणि आम्हा सैनिक टाकळीकराना या कुटुंबाचा अभिमान आहे. खरा-ोखरच सर्वच मुला मुलींनी यांचा आदर्श घेतला पाहिजे व त्यांनी सुद्धा या मुलां प्रमाणे आपल्या शैक्षणिक काळात कष्ट करून आपल्या आई-वडिलांचे नाव रोशन केले पाहिजे.

## मान्सुनपुर्व देखभाल व दुरुस्तीचे कामे महावितरणाकडून युध्दपातळीवर पुर्णात्वाकडे

# पावसाळ्यात विज ग्राहाकांनी स्वत:ची व कुटुंबाची काळजी घ्या : निलेश नागरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाडसह नाशिक जिल्ह्यात अवकाळी पावस-ाने जोरदार हजेरी लावल्यानंतर आता पावसाळ्याचे वेध लागले आहेत. काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या या पार्श्वभूमीवर, संभाव्य धोके टाळण्यासाठी महावितरणने कंबर कसली आहे. मान्सूनपूर्व देखभाल आणि दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू असून ती पुर्णात्वाकडे वाटचाल करित आहे,तालुक्याच्या सर्व ग्रामीन व शहरी भागात नागरिकांनीही स्वतःच्या स्तरा-वर वीज उपकरणांची विशेष काळजी घेणे अत्यावश्यक आहे, असे आव-ाहन महावितरणाचे निफाड विभागाचे उप कार्यकारी अभियंता निलेश नागरे यांनी केले आहे.

विजेची उपकरणे हाताळताना आ-पले हात पूर्णपणे कोरडे असल्याची खात्री करा. ओल्या हातांनी विद्युत उपकरणांना स्पर्श करणे धोकादायक ठरू शकते. विद्युत उपकरणांचा पाण्याशी संपर्क येणार नाही याची दक्षता घ्या. पाणी विद्युत वाहक असल्याने अपघात होण्याची शक्यता असते.उपयोग नसताना विद्युत उपकरणांचे प्लग बोर्डातून काढून ठेवा. यामुळे अनावश्यक वीज वापर टाळता येतो आणि सुरक्षितताही राखली जाते. घरातील अर्थिंगची नियमित तपासणी करा. व्यवस्थित अर्थिंग नसल्यास विजेचा धक्का बसण्याचा धोका वाढतो. वीज पुरवठ्यातील चढ-उताररांमुळे उपकरणे खराब होऊ शकतात. त्यामुळे शक्य असल्यास स्टॅबिलायझरचा वापर करा. पावसाळ्यात ओलसर भिंतींना स्पर्श करणे टाळा. तसेच, वीजप्रवाह उतरण्याची शक्यता असलेली उपकरणे ओलसर भिंतींजवळ ठेवू नका. ज्यांचे घर पत्र्याचे आहे, त्यांनी पावसाळ्यापूर्वी घरातील वायरिंगची तपासणी करून घ्यावी. इन्व्हर्टर, युपीएस आणि बॅटरीसारख्या उपकरणांची वेळोवेळी तपासणी करणे महत्त्वाचे आहे. विजा कडकडत असताना टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशिन यांसारखी विद्युत उपकरणे वापरणे टाळा. पावसाळ्याच्या दिवसांत वीजेचे खांब धोकादायक ठरू शकतात. त्यामुळे या खांबांपासून सुरक्षित अंतर ठेवा. वीज रोहित्र किंवा खांबाजवळ खड्डा असल्यास आणि त्यात पाणी साचले असल्यास त्यापासून दूर राहा. घराजवळ वीज तारा लोंबकळत असल्यास त्याची माहिती तत्काळ महावितरणच्या कर्मचाऱ्यांना द्या. स्वतः दुरुस्ती करण्याचा प्रयत्न करू नका.जर कुणाला विजेचा धक्का बसला, तर त्याला थेट हात लावू नका. लाकडी काठी किंवा इन्सुलेटेड वस्तूने त्याला अलग करा आणि त्वरित उपचारासाठी रुग्णालयात घेऊन जा.पावसाळ्यापूर्वी आपल्या परिसरातील वीज खांब, तारा, रोहित्र किंवा इतर कोणत्याही विद्युत उपकरणात काही बिघाड आढळल्यास स्वतः दुरुस्ती करण्याचा प्रयत्न करू नये. त्याऐवजी त्वरित आपल्या भागा-तील महावितरणच्या कर्मचाऱ्यांशी संपर्क साधावा. वीज खांबांना स्पर्श करणे टाळा आणि पावसाळ्यापूर्वी घरातील वायरिंग व अर्थिंग तपासून संभाव्य धोका टाळा. अनेकदा पावसाळ्यात वीजपुरवठा खंडित झाल्यास काही नागरिक त्वरित वीज सुरू करण्याच्या प्रयत्नात अकुशल वायरमनची मदत घेतात. मात्र, असे करणे धोकादायक ठरू शकते आणि त्यामुळे गंभीर अपघ-ात होण्याची शक्यता असते. त्यामुळे, अधिकृत तंत्रज्ञांचीच मदत घ्यावी, असे आवाहन नागरे यांनी केले आहे.

# अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्यांवर करमाळा पोलिसांची मोठी कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : करमाळा पोलीस ठाणे हद्दीत अवैध वाळू उपसा व वाहतूक करणारी इसमावर कारवाई करून १९ ब्रास वाळू व एक टेम्पो असा एकूण चार४,९०,०००/ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त.



दिनांक १६/५/२०२५ रोजी पोलीस निरीक्षक रणजीत माने यांनी गोपनीय माहिती मिळाली की मौजे वांगी नंबर ३ तालुका करमाळा येथे चोरून वाळू वाह-तूक सुरू आहे अशी बातमी मिळाल्याने सदर ठिकाणी कारवाई करणे करिता मा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अजित पाटील साहेब उपविभागीय पोलीस अधिकारी करमाळा उपविभाग करमाळा यांना माहिती देऊन छापा कारवाई करिता पोलीस निरीक्षक रंजीत माने पोलीस ना./१७६ प्रमोद गवळी पोना.११६२. मनीष पवार, पो.ना.१९२. वैभव ठेंगल पोशी./११४३ सोमनाथ जगताप पुशी८५६ अर्जुन गोसावी पोशी४३८/ रविराज गटकुळ. पुशी१७४८/ ज्ञा-नेश्वर घोंगडे.. पो. शी./११५३ मल्हार सर्व करमाळा पोलीस ठाणे व दोन पंच असे बातमीचे ठिकाण जाऊन मौजे वांगी नंबर तीन तालुका करमाळा येथील नदीपत्राकडे जात असताना काही अंतरावर इसम नामे सुह-ास उर्फ सिद्धू भारत तावशी व राजेश महेंद्र रोकडे असे वाळ-वणी भरलेली टेम्पो घेऊन तिथून पळून गेले त्याचा पाठलाग करीत उजनी जलाशयाकडे जात असताना समोरून टाटा कंपनीचा टेम्पो क्रमांक के ८२ १८ हा दिसल्याने त्याच पोलिसांनी त्यांची गाडी आडवी लावली असता त्या टेम्पो चालक आनंद सुखदेव सातव राहणार वांगी नंबर तीन तालुका करमाळा टेम्पो सोडून तिथून पळून गेला सदर टेम्पोमध्ये एक ब्रास माळून मिळून आली

तसेच सदर इसमानी उजनी जलचयेच्या कडेला वाळूचा उपसा करून देणारा घातल्याचे दिसून आल्याने त्याबाबत पंचनामा करून वरीलिस्मान वर करमाळा पोलीस ठाणे गोरा नंबर ३९२/२०२५ भानस कलम ३०३(२)३(५) सह पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९ व १५ प्रमाणे १) सुहास उर्फ हिंदू भारत तावशी२) राजेश महेंद्र रोकडे व३) आनंद सुखदेव सातव सर्व राहणार वांगी नंबर तीन तालुका करमाळा यांच्या विरोध गुन्हा दाखल करण्यात आला आहे सदर कारवाई मध्ये अंदाजे एक लाख ८० हजार किमतीचा अंदाज १८ ब्रास वाळूचा ढिगारा अंदाजी तीन लाख दहा हजार किमतीचा टाटा ४०७ टेम्पो क्रमांक एम एच दहा कि ८२ १८ त्यात अंदाजे एक ब्रास वाळू असा एकूण४.९००००/ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी सोलापूर ग्रामीण अप्पर पो-लीस अधीक्षक प्रीतम यावर कर सोलापूर ग्रामीण उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील करमाळा उपविभाग करमाळा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रणजीत माने यांच्या पकाने केले आहे.










# पोलीस हेड कॉन्स्टेबललाही गुन्ह्यांचा तपास करण्याचा अधिकार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील गुन्हेगारी सातत्याने वाढ होतानाचा चित्र पाहायला मिळत असून सध्य सायबर गुन्हेगारीचेही प्रमाण वाढले आहे. एकीकडे गुन्हेगारीत वाढ झाली असताना दुसरीकडे पोलिसांवरील ताण-तणाव आणि कामाचा अतिरिक्त भार वाढतच आहे. वाढत्या नागरिकरणावर आणि गुन्हेगारीच्या घटनांमुळे पोलीस यंत्रणा अपुरी पडत असून पोलीस खात्यात भरती करण्याची मागणीही गृहखात्याकडे केली जाते. दरम्यान, आता वाढत्या गुन्हेगारीच्या आणि अपुऱ्या पोलीस मनुष्यबळाच्या पार्श्वभूमीवर गृहखात्याने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्याच्या पोलिस दलातील अपुऱ्या मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेता, गृहविभागाने पोलिस हेड कॉन्स्टेबललाही गुन्ह्यांचा तपास करण्याचे अधिकार दिले आहेत. यापूर्वी, केवळ पोलीस उपनिरीक्षक पदापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे हा अधिकार होता. आता, पोलीस वरिष्ठ हवालदार यांनादेखील गुन्ह्याचा तपास करता येणार आहे. मात्र, त्यासाठी काही अटी घालून देण्यात आलेल्या आहेत. राज्यात पोलीस हेड कॉन्स्टेबल यांना गुन्ह्याचा तपास करण्यात अधिकार गृह विभागाने दिले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाकडून राजपत्र जारी करत याबाबतची माहिती देण्यात आली आहे. मात्र, त्यासाठी काही अटही घालण्यात आल्या आहेत. त्यानुसार, पोलिस हेड कॉन्स्टेबल हा पदवीधर असावा, त्यांनी ७ वर्षे सेवा पूर्ण केलेली असावी. त्यासोबतच, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय नाशिक येथील ६ आठवड्याचे विशेष प्रशिक्षण पूर्ण व परीक्षा उत्तीर्ण असणे गरजेचे राहणार आहे. राज्य शासनाच्या गृह विभागाने ९ मे रोजी राजपत्र जारी करत निर्देश दिले आहेत. शहरी भागात अपुरे मनुष्यबळ जरी असले तरी अधिकाऱ्यांची संख्या ही व्यवस्थित आहे. त्यामुळे गुन्ह्यांचा तपास हा पोलिस उपनिरीक्षक पदापासून वरील पदाधिकाऱ्यांकडे दिला जातो. मात्र, ग्रामीण भागात अपुऱ्या मनुष्यबळाबरोबरच अधिकाऱ्यांची संख्या देखील कमी आहे. अशात एकाच अधिकाऱ्याकडे अनेक गुन्ह्यांचा तपास दिल्याने अधिकाऱ्यांवरील ताणही वाढत आहे.

## वाढदिवस संवेदनशील व्यक्तिमत्वाचा

# नित्यानंद सेवा प्रकल्प हिवरा आश्रम येथील मुलांसोबत केला वाढदिवस साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मोडलेल्या माणसांचे दुःख ओले झेलताना!!
त्या अनाथांच्या उशाला दीप लावू झोपताना!!
कोणती ना जात त्यांची कोणता ना धर्म त्यांना!!
दुःख भिजले दोन अश्रू माणसाचे माणसांना!!

या उक्ती प्रमाणे या समाजाचे काही देणं लागतो या हेतुतून संवेदनशील व्यक्तीमत्व श्री मनोज शिंगणे सर यांचा वाढदिवस आपण या समाजाचे काहीतरी देणं लागतो, वाढदिवसाचा वायफळ खर्च टाळून अनाथ मुलांची सेवा करण्याची इच्छा असल्यामुळे व आपले कर्तव्य आहे या समाजासाठी काहीतरी करणं व आपल्या आनंदात अनाथ मुलांना सामावुन घेणं व त्यांची मदतरुपी सेवा करुन त्याचं दुःख कमी करणं म्हणुन अनाथ मुलांसोबत वाढदिवस साजरा करण्यासाठी नित्यानंद सेवा प्रकल्प हिवरा आश्रम या ठिकाणी जाऊन तेथील मुलांना एक महिन्याच्या जीवनावश्यक वस्तू भेट म्हणून दिल्या व मुलांसोबत अत्यंत साध्या पदधतीने वाढदिवस साजरा केला. यावेळी सोबत श्री. नकुलभाऊ शिंगणे (उपसरपंच ग्रामपंचायत शेंदुर्जन) श्री. अमोल भाऊ शिंगणे (ग्राम पंचायत अधिकारी) नितीन भाऊ शिंगणे व श्री. सिद्धुभाऊ जाधव यांच्या उपसथितीमध्ये नित्यानंद सेवा प्रकल्प येथील संचालक अनंत शेळके हे उपस्थिती होते.




# माणुसकी सोशल फाउंडेशनतर्फे समाजभूषण पुरस्कार वितरण सोहळा थाटात संपन्न

## माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते मान्यवरांचा गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजन समाजाच्या उत्थानासाठी दिलेला लढा आजच्या काळातही दिशादर्शक आहे. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी आपली आहे. सामाजिक बांधिलकीच्या दिशेने काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा गौरव म्हणजे प्रेरणादायी क्षण असून माणुसकी सोशल फाउंडेशनचं हे कार्य अत्यंत मोलाचं आहे, असे गौरवोद्गार राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी काढले.

निफाड येथील लक्ष्मी पतसंस्था सभागृहात माणुसकी सोशल फाउंडेशनच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त 'समाजभूषण पुरस्कार' वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन सागर निकाळे यांनी केले होते. यावेळी निफाड नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे शिवाजीराजे ढेपले, तालुकाध्यक्ष भाऊसाहेब भवर, ड. सोमनाथ घोटेकर (श्री संत निवृत्तीनाथ महाराज देवस्थान अध्यक्ष), ड. शेखर देसाई, प्रा. शरद शेजवळ, डॉ. श्रीकांत आवारे, डॉ. सुजित गुंजाळ, मधुकर शेलार, कवी राजेंद्र सोमवंशी, किशोर वडजे, राहुल सोनवणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

हा केवळ पुरस्कार नव्हे, तर समाजासाठी निःस्वार्थ सेवा करणाऱ्या व्यक्तींच्या त्यागाचा सन्मान आहे, असे सांगत भुजबळ यांनी पुरस्कारप्राप्त सर्व व्यक्तींना शुभेच्छा दिल्या.




# सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव ; सनातन राष्ट्राचा जयघोष करत नाशिक येथील ३५० हिंदुत्वनिष्ठ गोव्याकडे रवाना

निफाड/प्रतिनिधी

मानवजातीच्या परमकल्याणासाठी, तसेच रामराज्याच्या स्थापनेसाठी कार्यरत सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि सनातन संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष या निमित्ताने फोंडा-गोवा येथे १७ ते १९ मे या कालावधीत 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. फार्मागुडी, फोंडा येथील गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर हा महोत्सव होत आहे. या महोत्सवासाठी नाशिक या जिल्ह्यातून सनातन संस्थेचे शेकडो साधक, हिंदू धर्मप्रेमी आणि हिंदुत्वनिष्ठ यांनी 'सनातन राष्ट्रा'चा जयघोष करत हिंदुत्ववादी तसेच साधक असे एकूण ३५० जणांनी बस मधून, वैयक्तिक वाहनाने, रेल्वेने व तसेच विमानाने गोव्याकडे प्रयाण केले. यावेळी हिंदुत्वनिष्ठांनी वाहनांवर लावलेल्या भगव्या ध्वजांमुळे वातावरणात चैतन्य पसरले होते.

या प्रसंगी खेडे निफाड येथील हिंगलाज माता मंदिरांचे विश्वस्त रामदास त्र्यंबक कोल्हे तसेच विविध मंदिर विश्वस्तांचे प्रमुख यांची उपस्थिती होती. या प्रसंगी मान्यवर यांनी इतर हिंदू बांधवांना या महोत्सव साठी उपस्थित राहण्याचे आवाहन सर्वांनी केले आहे.